NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE
नागपूर शहर पोलीस आयुक्तालय
(पोलीस वार्तापत्र)
सकाळ

---

दिनांक 14.02.2018 बुधवार
(गुन्हे)

1) दारुबंदी, जुगार व ड्रंकन ड्राईव्ह कायदा अंतर्गत करण्यात आलेली कारवाई :

मुदाका अन्वये 05 केसेस 05 आरोपींना अटक करून 6,0380 रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये 04 केसेस 23 आरोपींना अटक करून 4,60,546 रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

मद्य प्राशन करुन वाहन चालविणा–या 72 वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली आहे.
वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण 938 वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली असून एकूण तडजोड शुल्क 2,58,700 रू वसुल करण्यात आले आहेत.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून या पुढेही कारवाई प्रभावीपणे करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

2) पो.स्टे. प्रतापनगर, हिंगणा – प्राणांतिक अपघात :

अ) प्रतापनगर – दि. 13.02.18 चे 1815 वा चे सुमारास उत्कर्ष उर्फ साई नागराज गुल्ला वय दिड वर्ष हा आपली आई, बहिण व आजी सोबत सेलु जि. वर्धा येथे जाण्याकरिता पो.स्टे. प्रतापनगर हद्दीत स्नहेनगर, बस स्टॉप छत्रपती चौक, येथे आले असता छत्रपती चौका कडून येणारी एस.टी. बस क्र. एमएच/40/ए.क्यु/6145 चा आरोपी चालक उमेश प्रभाकर कुशिकांत, रा. वार्ड नं. 6, राजुरा, भारत चौक, चंद्रपुर याने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपणे चालवून उत्कर्ष याला धडक मारून त्याचे मरणास कारणीभूत ठरला. याप्रकरणी पो.स्टे. प्रतापगर येथे सपोउपनि, गजानन, 9850944423 यांनी आरोपी चालकाविरूध्द कलम 279,304(अ) भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

ब) हिंगणा – दि. 12.02.18 चे 1730 वा चे सुमारास जयंत दिवाकर पेठकर, वय 60 वर्ष, रा. सहारा सिटी, नागपूर हे ॲक्टिव्हा गाडी क्र. एमएच/34/ए.जे/0989 ने जात असतांना पो.स्टे. हिंगणा हद्दीत सहारा सिटी ते जामठा रोडवर इनोव्हा गाडी क्र. एमएच/09/बी.एक्स/0070 चा अनोळखी आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने निष्काळजीपणाने व भरधाव वेगाने चालवून जयंत यांना मागून धडक मारून त्यांना गंभीर जख्मी करून त्यांचे मरणास कारणीभूत ठरला. याप्रकरणी फिर्यादी नंदकिशोर दिवाकर पेठकर, वय 64 वर्ष, रा. प्लॉट नं. 24, भामटी, यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो. स्टे. हिंगणा येथे पोहवा भलवी, 9823364634 यांनी आरोपी चालकाविरूध्द कलम 279,304(अ) भादंवि सहकलम 184,134,177 मोवाका अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

3) पो.स्टे. नंदनवन, बेलतरोडी, जरीपटका – गंभीर दुखापत करणा–या आरोपविरूध्द गुन्हा दाखल :

अ) नंदनवन – पो.स्टे. नंदनवन हद्दीत हिवरी नगर, झोपडपट्टी येथे राहणारी फिर्यादी रोशनी पतीराम बावणे, वय 18 वर्ष, हिचा भाऊ यशवंत यांचे सायकलला वस्तीत राहणारा विधिसंघर्ष बालक याने दांडा मारला असता फिर्यादीच्या भावाने आरोपीच्या आईला सांगितले होते. या गोष्टीचा मनात राग धरून दि. 13.02.18 चे 1530 वा चे सुमारास फिर्यादी ही आपल्या घरासमोर मैत्रीणीसह खेळत असतांना विधिसंघर्ष बालक याने आपल्या जवळील लाकडी दांडयाने फिर्यादीच्या डोक्यावर मारून गंभीर

जख्मी केले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. नंदनवन येथे पोहवा बांते, 8669022108 यांनी कलम 326 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

<u>ब) बेलतरोडी</u> – दि. 12.02.18 चे 2130 वा चे सुमारास पो.स्टे. बेलतरोडी हद्दीत न्यु वैशाली नगर, चिंचभवन, वर्धा रोड येथे राहणारे फिर्यादी प्रफुल्ल रंगनाथ डोंगरे, वय 35 वर्ष हे आपल्या घरी झोपले असता त्यांचे बेडखाली आरोपी मनोज महादेव लाकडे, वय 20 वर्ष, रा. न्यु वैशाली नगर, नागपूर हा लपुन होता फिर्यादीस आवाज आल्याने त्यांनी पाहले असता आरोपी त्यांना आढळून आला फिर्यादीने जाब विचारले असता आरोपीने आपल्या जवळील धारदार हत्याराने फिर्यादीचे गळयावर वार करून गंभीर जखमी केले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. बेलतरोडी येथे सपोनि आवटे, 9821252353 यांनी आरोपीविरूध्द कलम 326,456 भादंवि अन्वये गुन्हा नोंदवून आरोपीस अटक केली आहे.

<u>क) जरीपटका</u> – दि. 13.02.18 चे 2030 वा चे सुमारास पो.स्टे. जरीपटका हद्दीत प्लॉट नं. 635, अहुजा नगर, येथे राहणा–या फिर्यादी सौ. सरोज मोहन करमचंदानी, वय 37 वर्ष यांनी आरोपी पती मोहन परसराम करमचंदानी, वय 43 वर्ष यांना फिर्यादीने दारू पिण्यास मनाई केली असता आरोपीने शिवीगाळ करून घरी असलेल्या ब्लेडने फिर्यादीच्या उजव्या हाताच्या बोटाला व पाठीवर वार करून गंभीर दुखापत केली तसेच फिर्यादीची आई शिलाबाई गभणे, वय 62 वर्ष या बचाव करण्यासाठी आल्या असता त्यांना सुध्दा गालावर व गळयावर वार करून गंभीर दुखापत केली. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. जरीपटका येथे पोउपनि व्ही.बी. पवार 9689628929 यांनी आरोपीविरूध्द कलम 326,504 भादंवि अन्वये गुन्हा नोंदवून आरोपीस अटक केली.

<u>ड) जरीपटका</u> – दि. 13.02.18 चे 1930 वा चे सुमारास पो.स्टे. जरीपटका हद्दीत प्लॉट नं. 143, लुंबिनी नगर, अंगुलीमार बौध्द विहाराजवळ राहणा–या फिर्यादी सौ. अहिल्याबाई सिध्दार्थ सहारे, वय 45 वर्ष, यांचे वस्तीत राहणारा आरोपी गौतम गणविर, वय 19 वर्ष, व त्यांचा मित्र गोंडीस, वय 19 वर्ष, हे घरासमोर बसले असता फिर्यादीचे पती सिध्दार्थ सहारे, वय 50 वर्ष यांनी त्यांना हटकले असता त्या गोष्टीचा राग मनात धरून आरोपीतांनी संगणमत करून काठीने फिर्यादीचे पतीच्या तोंडावर मारून गंभीर दुखापत करून पळून गेले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. जरीपटका येथे पोउपनि व्ही.बी. पवार, 9689628929 यांनी आरोपीविरूध्द कलम 326,504,34 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

<u>4) पो.स्टे. लकडगंज – चोरी :</u>

दि. 13.02.18 चे 1620 वा चे सुमारास फिर्यादी खेमराज कांजीभाई बेगड, वय 41 वर्ष, रा. टिळक नगर, प्लॉट नं. 166, अमरावती रोड, नागपूर यांनी आपली चारचाकी गाडी क्र. एमएच/40/ए/6686 ही पो.स्टे. लंकडगंज हद्दीत श्री साई प्लॉयवुड समोर, सुदर्शन चौक, येथे पार्क केली असता कोणीतरी अज्ञात चोराने ड्रायव्हर साईडचा दरवाजा उघडून आत ठेवलेली बॅग ज्यामध्ये लॅपटॉप, कागदपत्रे व नगदी 40,000 रू असा एकुण 45,000 रू चा मुद्येमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. लकडगंज येथे सपोउपनि, उपाध्याय, 9923250267 यांनी आरोपीविरूध्द कलम 379 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

<u>5) पो.स्टे. नंदनवन, जरीपटका – पळवून नेणा–या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल :</u>

<u>अ) नंदनवन</u> – दि. 13.02.18 चे 1430 वा चे सुमारास पो.स्टे. नंदनवन हद्दीत डायमंड नगर, गजानन मंदीराजवळ राहणा–या फिर्यादी कलाक्षी किशोर साळवे, वय 38 वर्ष, यांचा भावाचा अल्पवयीन मुलगा प्रज्वल तिरीदास रेपांडे, वय 15 वर्ष हा क्लासला गेला असता परत आला नाही. शोध घेतला असता मिळून आला नाही. बेपत्ता आहे. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व मा. सर्वोच्च न्यायलयाचे निर्देशानुसार पो.स्टे. नंदनवन येथे पोउपनि थोरात, 7720044989 यांनी कलम 363 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

<u>ब) जरीपटका</u> – दि. 13.02.18 चे 1800 वा चे सुमारास पो.स्टे. जरीपटका हद्दीत राहणारे फिर्यादी यांच्या मोठया भावाची 14 वर्षीय अल्पवयीन मुलगी ही नारी रोड बस स्टॉप येथे जाते असे सांगून गेली परत आली नाही. शोध घेतला असता मिळून आली नाही. बेपत्ता आहे. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. जरीपटका येथे पोउपनि व्ही.बी. पवार 9689628929 यांनी कलम 363 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

## (अकस्मात मृत्यु)

**पो.स्टे. कोतवाली :**

दि. 13.02.18 चे 2325 वा चे सुमारास पो.स्टे. कोतवाली हद्दीत नवाबपुरा, तेलीपुरा मस्जिद मागे राहणारे गजानन रघुनाथ ठगे, वय 56 वर्ष हे आपले घरी बाथरूममध्ये चक्कर येवून पडल्याने त्यांना उपचाराकरिता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे. कोतवाली येथे सपोनि, एन.एन. कुंभार, 7798666969 यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

.

पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर